(1) 247

क्रमांक: एलआरएफ-२६०३/४७२/प्र.क्र. १५२५/ज-३
महसूल व वन विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक - १५ ऑक्टोबर, २००८

22 OCT 2008

विषय:- जमीन - मुंबई उपनगर जिल्हा
मौजे वांद्रे, स.नं. ३४१, नभूक्र. ६२९ (पैकी) "एफ" ब्लॉक मधील भूखंड क्र. ५ पैकी "मोकळी जागा" व "स्टेडियम" या आरक्षणाखालील सुमारे ४००० चौ.मी.शासकीय जमीन वीरशैव कक्कय्या समाज उन्नती मंडळ (आता ना.श्री.सुशिलकुमार संभाजी शिंदे प्रतिष्ठान) या संस्थेस शैक्षणिक उपक्रमाकरीता (शाळेकरीता), अंतिमरित्या मंजूर करणेबाबत.

ज्ञापन:-

जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांना, त्यांचे पत्र क्र.११अ/ एक २७२, दि.१४/२/२००७ व विभागीय आयुक्त, कोकण यांचे पत्र क्र. मशा/का-२/जमीन-३/कावि-३६६३/०३, दि.२१/५/२००७ ला अनुलक्षून विज्ञप्तिपूर्वक असे कळविण्यात येते की, मौजे वांद्रे, स.नं. ३४१, नभूक्र. ६२९ (पैकी) "एफ" ब्लॉक येथील भूखंड क्र. ५ मधील "स्टेडियम" व "मोकळी जागा" या आरक्षणापैकी "मोकळी जागा" या आरक्षणाखालील एकूण जमिनीपैकी एक एकर (सुमारे ४००० चौ.मी.)जमीन वीरशैव कक्कय्या समाज उन्नती मंडळ (आता नामदार सुशिलकुमार संभाजी शिंदे प्रतिष्ठान) या संस्थेस शैक्षणिक उपक्रमासाठी (शाळेकरीता) विशिष्ट अटी / शर्तीची पुर्तता करण्याच्या अटीवर देण्याबाबत हेतुपत्र दि.२४/८/२००४ रोजी देण्यात आले होते. आता या संदर्भात जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांचेकडून प्राप्त झालेल्या अहवालाच्या अनुषंगाने, वीरशैव कक्कया उन्नती समाज मंडळ संस्थेस (आता नामदार सुशिलकुमार संभाजी शिंदे प्रतिष्ठान) मौ.वांद्रे, स.नं.३४१, नभूक्र.६२९(पैकी) "एफ" ब्लॉक मधील भूखंड क्र.५ मधील "स्टेडियन" व "मोकळी जागा" या आरक्षणापैकी "मोकळी जागा" या आरक्षणाखालील सुमारे १ एकर (४००० चौ.मी.क्षेत्र) शासकीय जमीन महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ५ व ६ आणि शासन परिपत्रक, दि.८/२/१९८३ मधील परिच्छेद १० व १२ मधील अटी /शर्तीची पुर्तता करण्याच्या अधीन राहून सदर जमिनीच्या सन २००८ च्या शीघ्रसिध्दगणकानुसार येणाऱ्या बाजारमुल्याच्या २५ टक्के इतकी कब्जेहक्काची रक्कम आकारुन नेहमीच्या अटी / शर्तीवर तसेच खालील विशिष्ट अटी / शर्तीवर इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यासाठी या ज्ञापनान्वये शासन मंजूरी देत आहे.

अटी :-अ) सदर जमीन भोगवटादार वर्ग-२ म्हणून मंजूर करण्यात येत असून शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय वापरात बदल/हस्तांतरण करता येणार नाही.

ब) संस्थेस जमीन ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आली आहे, त्याच प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

क) सदर जमिनीलगत असलेल्या वाकोला नाला रुंदीकरण प्रस्तावाबाबत प्रकल्प संचालक व सदस्य सचिव, मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण यांचेकडून घालण्यात येणाऱ्या अटी/शर्ती तसेच नगर विकास विभागाकडून घालण्यात येणाऱ्या अटी/शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

ड) सदर क्षेत्राचा सुधारित अभिन्यास करण्याचा एमएमआरडीए ने जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर यांना सादर केलेला प्रस्ताव जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर/ विभागीय आयुक्त,

कोकण विभाग यांनी या विभागास सादर केलेला असून सदर प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. सदर क्षेत्राच्या सुधारित अभिन्यासास शासनाने मंजूरी प्रदान केल्यास संस्थेस प्रदान करण्यात आलेल्या जमिनीचे क्षेत्र व स्थान इत्यादीमध्ये बदल संभवित असल्याने जमिनीच्या क्षेत्रामध्ये तथा स्थानांमध्ये बदल झाल्यास या संदर्भात शासनाकडून घेण्यात येणारे निर्णय संस्थेवर बंधनकारक राहतील.

इ) जमिनीचा वापर शैक्षणिक प्रयोजनासाठी करण्यात येणार असल्याने शालेय शिक्षण विभागाच्या यासंदर्भातील सर्व अटी/शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

फ) शैक्षणिक प्रयोजनाकरिता सवलतीच्या दराने शासकीय जमीन प्रदान करणे बाबत शासनाच्या प्रचलित धोरणामध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन असून, त्यामध्ये ठरविण्यात येणारे धोरण (कब्जेहक्काच्या सहमतीसह) संस्थेवर बंधनकारक राहील असे रु. १००/- च्या स्टॅम्पपेपरवर हमीपत्र सादर करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

ग) जिल्हाधिकारी, मुंबई उपनगर जिल्हा/विभागीय आयुक्त, कोकण विभाग यांचेकडून घालण्यात येणाऱ्या इतर अटी/शर्ती.

२. हे ज्ञापन नगर विकास विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्र. २६३/युओआर/नवि-११, दि.२५/१०/२००७, शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्र.१८७, दि.०८/०४/२००८ तसेच वित्त विभागाच्या सहमतीने त्यांचा अनौपचारिक संदर्भ क्र. २७२/०८/व्यय-९, दि.०७/०६/२००८ अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

(वि. सि. वखारे)
अवर सचिव,
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी,
मुंबई उपनगर जिल्हा,
प्रशासकीय इमारत१० वा मजला,
वांद्रे (पूर्व), मुंबई -४०००५१.

प्रतिलिपी :-
१) विभागीय आयुक्त, कोकण विभाग, कोकण भवन, नवी मुंबई.
२) उपसंचालक, भूमि अभिलेख, मुंबई.
३) महालेखापाल (लेखा परीक्षा)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
५) सहाय्यक संचालक, नगररचना व मूल्यनिर्धारण, मुंबई उपनगर जिल्हा.
६) वित्त विभाग (व्यय-९), मंत्रालय, मुंबई.
७) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
८) शालेय शिक्षण व क्रीडा विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
९) वीरशैव कक्कय्या समाज उन्नती मंडळ (आता मा.श्री.सुशिलकुमार संभाजी शिंदे प्रतिष्ठान), बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, सीटीएस नं.६२९, स.नं.३४१ (पी.टी.), एफ ब्लॉक, प्लॉट नं.५, बांद्रा (पू.), मुंबई-४०० ०५१.
१०) ज-३ कार्यासन (नियडनस्ती) महसूल व वन विभाग

# ...धिकारी, मुंबई उपनगर जिल्हा यांचे कार्यालय

प्रशासकीय इमारत, १० वा मजला, सरकारी वसाहत, बांद्रा (पू) मुंबई-५१

दूरध्वनी : ६५५६७९९, फॅक्स : ६५५६८०५ E mail – collrmsd@yahoo.com


क्रमांक : ११/३ अ/एफ-२७२
दिनांक : ९ /०६/२००९

वाचले : १) शासन, महसूल व वन विभागाकडील ज्ञापन क्र. एलआरएफ-२६०३/४७३/प्र.क्र.१५२५ /ज-३ दि. १५/१०/०८ व शुध्दीपत्रक दिनांक २०/२/०९

२) या कार्यालयीन पत्र समक्रमांक दि. ११/११/०८ व दिनांक ७/३/०९.

३) संस्थेचे पत्र दि. २७/४/०९ व दिनांक १२/५/०९

आदेश :

मौजे बांद्रा, ता. अंधेरी येथील स.नं. ३४१, न.भू.क्र. ६२९ पै. 'एफ' ब्लॉकमधील भूखंड क्र. ५ मधील "स्टेडीयम" व "मोकळी जागा" या आरक्षणापैकी "मोकळी जागा" या आरक्षणाखालील एकूण जमिनीपैकी १ एकर (४,००० चौ.मी.) जमिन महाराष्ट्र जमिन महसूल (सरकारी जमिनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ५ व ६ आणि शासन, परिपत्रक दि. ०८/०२/१९८३ मधील परिच्छेद १० व १२ मधील अटी/ शर्ती यांच्या अधिन राहून तसेच शासन निर्णय दि. ११/०५/१९८४ मधील तरतूदीनुसार सदर जमीनीच्या सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग यांचेकडून निर्धारीत करण्यात येणाऱ्या दिनांक १/२/७६ रोजीच्या एकूण मुल्याच्या २५ टक्के इतकी रक्कम कब्जेहक्काची रक्कम म्हणून वसूल करुन नेहमीच्या अटी/ शर्तीवर तसेच काही विशिष्ट अटी/शर्तीवर इंग्रजी माध्यमाची शाळा सुरु करण्यास ना.सुशिलकुमार संभाजी शिंदे प्रतिष्ठान (वीरशैव कक्कया समाज उन्नती मंडळ ), मुंबई या संस्थेस मंजूर करण्यास शासनाने मान्यता दिली आहे.

प्रस्तुत जमीनीची दिनांक १ फेब्रुवारी १९७६ च्या बाजारभावाप्रमाणे किंमत रु. ९००/- प्रती चौ. मी. या दराने होणारी सवलतीची कब्जेहक्काची रक्कम रु. ९,००,०००/- या कार्यालयात भरणा करणेस संस्थेस दिनांक ७/३/०९ च्या पत्राने कळविण्यात आले होते. तसेच जमीनीची सहाय्यक संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग यांचेकडून निर्धारीत केल्यानुसार येणारी अंतिम सवलतीची कब्जेहक्काची रक्कम व तात्पुरती किंमत यामधील फरकाची रक्कम शासनाने विहित केलेल्या व्याजासह भरणा करणेस तयार असलेबाबत आणि उपरोक्त दिनांक ८ मे २००८ च्या ज्ञापनातील अटी क्रमांक अ ते म संस्थेस मान्य व संस्थेवर बंधनकारक राहतील अशा आशयाचे हमीपत्र रु. १००/- च्या मुद्रांक शुल्क कागदावर करुन सादर करणेस संस्थेस दिनांक ११/११/०८ च्या पत्राने कळविणेत आले होते.

संस्थेने त्यांचे दिनांक २७/४/०९ च्या पत्रान्वये अभ्युदय को.ऑप बँक लि.वाशी शाखेकडील पे ऑर्डर क्र.१४५२०५ दिनांक २७/४/०९ व्दारा सवलतीची कब्जेहक्काची रक्कम भरणा केली आहे. तसेच तात्पुरती सवलतीची कब्जेहक्काची किंमत व अंतिम सवलतीची कब्जेहक्काची किंमत यातील फरकाची रक्कम व्याजासह भरणेस तयार असलेबाबत व संस्थेस घातलेल्या अटी संस्थेस मान्य व संस्थेवर बंधनकारक राहतील, असे हमीपत्र दिनांक १२/५/०९ रोजी रुपये १०० /- च्या मुद्रांक शुल्क कागदावर सादर केले आहे.

त्याअर्थी, मौजे बांद्रा, ता. अंधेरी येथील स.नं. ३४१, न.भू.क्र. ६२९ पै. एफ ब्लॉकमधील भूखंड क्र. ५ मधील "मोकळी जागा" असे आरक्षणाखालील १ एकर (४,००० चौ मी.) जमीन, महाराष्ट्र जमीन महसूल (सरकारी जमीनीचे वितरण) नियम १९७१ मधील नियम ५ व ६, व शासन परिपत्रक दि. ०८/०२/१९८३ मधील परिच्छेद १० व १२ मधील अटी/ शर्तीवर तसेच शासन निर्णय दि. ११/०५/१९८४ मधील तरतूदीनुसार खालील विशिष्ट अटी/ शर्तीवर प्रदान करण्यास मंजूरी देण्यात येत आहे.

**अटी :-**

१. सदर जमिन भोगवटदार वर्ग-२ म्हणून मंजूर करण्यात येत असून शासनाच्या पूर्वपरवानगीशिवाय वापरात बदल/ हस्तांतरण करता येणार नाही.

२. संस्थेस जमिन ज्या प्रयोजनासाठी मंजूर करण्यात आली आहे, त्याच प्रयोजनासाठी जमिनीचा वापर करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

३. सदर जमिनीलगत असलेल्या वाकोला नाला रुंदीकरण प्रस्तावाबाबत प्रकल्प संचालक व सदस्य सचिव, मिठी नदी विकास व संरक्षण प्राधिकरण यांचेकडून घालण्यात येणाऱ्या अटी/शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

४. सदर क्षेत्राच्या सुधारीत अभिन्यासाबाबत प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन आहे. सदर क्षेत्राच्या सुधारीत अभिन्यासास शासनाने मंजूरी दिल्यास संस्थेस प्रदान केलेल्या जमिनीचे क्षेत्र व स्थान इ.मध्ये बदल संभावित आहे. जमिनींच्या क्षेत्रामध्ये तथा स्थानांमध्ये बदल झाल्यास या संदर्भात शासनाकडून घेण्यात येणारे निर्णय संस्थेवर बंधनकारक राहतील.

५. शासनाचे शालेय शिक्षण विभागाचे अटी व शर्ती संस्थेवर बंधनकारक राहतील.

६. प्रस्तुत जमिनीची तात्पुरती सवलतीची किंमत व सहा. संचालक, नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग यांचेकडून निर्धारीत केल्यानुसार येणारी अंतिम सवलतीची कब्जेहक्काची किंमत यामधील फरकाची रक्कम शासनाने विहीत केलेल्या व्याजासह भरणा करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

प्रत अधीक्षक जिल्हाधिकारी यांची सही आहे.

(सही)
जिल्हाधिकारी
मुंबई उपनगर जिल्हाकरिता

प्रति,
~~चेअरमन~~
ना.सुशिलकुमार संभाजी शिंदे प्रतिष्ठान मुंबई
(वीरशैव कणकया समाज उन्नती मंडळ)
द्वारा श्री.बी.जी.शिंदे
११०४,राम लक्ष्मण टॉवर, सेक्टर १८,
वाशी ,नवी मुंबई